


दैनिक

# आरंभपर्व

आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com

**1,22,570**
डिजिटल प्रतींचे दररोज सोशल मीडियाच्या माध्यमातून वितरण होणारे
पुण्यातील लोकप्रिय दैनिक



● वर्ष : ०२ ● अंक : ०८४ ● पुणे ● शनिवार, दि. ८ फेब्रुवारी २०२५ ● मराठी दैनिक ● पाने ४ ● किंमत : २ रूपये ● RNI No.-MAHMAR/2023/89313




## सिंहगड फेस्टीवल २०२५

खरेदी, संगीत आणि धमाल एकाच छताखाली!



स्थळ :
हिंगणे चौक, नगरसेवक ॲड. श्री प्रसन्नदादा जगताप यांच्या संपर्क कार्यालय समोर, सिंहगड रोड, पुणे.
दिनांक: ८ व ९ फेब्रुवारी २०२५
वेळ: सायं ५ ते रात्री १० वाजेपर्यंत

## पारिवारिक मैफिल में सुरों का हमसफर

जितेंद्र भुरुक प्रस्तुत



## गीतों का सफर

स्थळ :
हिंगणे चौक, नगरसेवक ॲड. श्री प्रसन्नदादा जगताप यांच्या संपर्क कार्यालय समोर, सिंहगड रोड, पुणे.
दिनांक: १० फेब्रुवारी २०२५
वेळ: सायं ४ ते रात्री १० वाजेपर्यंत

**ॲड. श्री. प्रसन्नदादा जगताप** (मा. नगरसेवक, मा.उपमहापौर) यांच्या वाढदिवसानिमित्त
भारती विद्यापीठ मेडिकल फाउंडेशन आणि डॉ. दुधभाते नेत्रालय व रेटिना सेंटर व ॲड. श्री. प्रसन्नदादा जगताप

### संयुक्त विद्यमाने मोफत महाआरोग्य तपासणी शिबीर

DR DUDHBHATE NETRALAYA & RETINA CENTER

१) मोतिबिंदू शस्त्रक्रिया
२) नेत्र तपासणी
३) दंत तपासणी
४) नाक, घसा, कान तपासणी
५) बीपी / शुगर तपासणी
६) महिलांसाठी स्वतंत्र तपासणी कक्ष

**रक्तदान शिबीर आणि मोफत चष्मे वाटप**

• विशेष : शस्त्रक्रिया योजनेअंतर्गत मोफत

योजना:
१) महात्मा ज्योतिबा फुले जनआरोग्य योजना
२) शहरी गरीब आरोग्य योजना (पुणे मनपा)


आवश्यक कागदपत्रे :
१) पिवळे/केशरी रेशनिंग कार्ड
२) आधारकार्ड





## भव्य आरोग्य शिबीर

सोमवार, दि १० फेब्रुवारी २०२५ रोजी | रोजी सकाळी १० ते दु. २
स्थळ : हिंगणे चौक, नगरसेवक ॲड श्री प्रसन्नदादा जगताप यांच्या संपर्क कार्यालय समोर, सिंहगड रोड, पुणे.





पुणे मनपा. माजी नगरसेवक, माजी उपमहापौर

## ॲड. श्री. प्रसन्नदादा जगताप

यांना वाढदिवसाच्या मनःपूर्वक शुभेच्छा..!

शुभेच्छुकः ॲड.प्रसन्नदादा जगताप मित्र परिवार

# सतरंज्या उचलणाऱ्यांना मिळणार १,९४,००० खुर्च्या



२०२४ हे नेत्यांच्या निवडणुकीचे वर्ष होते; पण २०२५ हे कार्यकर्त्यांच्या निवडणुकीचे वर्ष असेल, असे भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी शिर्डीतील पक्षाच्या अधिवेशनात म्हटले होते. २७ हजार ग्रामपंचायतींसह सर्वच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका यावर्षी होतील आणि त्यात काही हजार कार्यकर्ते, तिसऱ्या, चौथ्या फळीतील नेते, कार्यकर्त्यांना लढविले जाईल, तरीही हजारो कार्यकर्ते पदांविनाच राहतील. त्यांची सोय करण्याचे काम आता हाती घेण्यात आले आहे.

१ लाख ९४ हजार विशेष कार्यकारी अधिकारी नेमण्यात येणार आहेत. भाजपला त्यातील ६० टक्के, तर मित्रपक्ष शिंदेसेना आणि अजित पवार गटाला प्रत्येकी २० टक्के पदे दिली जातील, अशी माहिती आहे. याचा अर्थ भाजपचे जवळपास लाखावर कार्यकर्ते 'एसईओ' होतील.

'एसईओं'च्या नेमणुकीचे अधिकार महसूल खात्याला आहेत आणि हे खाते बावनकुळे यांच्याकडे आहे. विविध प्रकारची प्रमाणपत्रे साक्षांकित करण्याचे अधिकार 'एसईओं'ना पूर्वी होते. त्यामुळे त्यांना फार भाव होता. काही वर्षांपासून प्रमाणपत्रे स्वसाक्षांकित करण्याची पद्धत सरकारने आणली आणि 'एसईओं'चे महत्त्व संपले, ते केवळ नामधारी झाले; पण गेल्या आठवड्यात महसूल विभागाने 'जीआर' काढून त्यांचे महत्त्व वाढविले.

त्यांना ग्रामसभेचे आमंत्रित सदस्य बनविण्यासह शहरी व ग्रामीण भागातील एसईओंना आणखी काही अधिकार दिले. त्यामुळे आता एसईओ होण्यासाठीही स्पर्धा असेल. महिनाभरात एसईओ नेमतो असे चंद्रभाऊ परवा सांगत होते. 'आम्ही फक्त सतरंज्याच उचलायच्या का?' असा सवाल भाजपचे अनेक कार्यकर्ते अनेकदा करत असतात. आता सतरंजी संघटनेच्या या कार्यकर्त्यांना राजकीय रोजगार दिला जाणार आहे.

भाजपच्या प्रत्येक मंत्र्याकडे पक्षाकडून एक पीए नेमला जात आहे. संघ, संघपरिवार आणि भाजपमधील व्यक्ती, संस्थांची कामे तातडीने कशी होतील एवढेच बघण्याचे काम या पीएंचे असेल. या सर्व पीएंचे समन्वयक म्हणून सुधीर देऊळगावकर यांना नेमले आहे. अनेक वर्षे ते नितीन गडकरींचे पीए होते, मग दुरावले. लोकसभेवेळी गडकरींनी त्यांना पुन्हा बोलावून घेतले, आता देऊळगावकर पूर्णवेळ भाजप प्रदेश कार्यालयात बसतात. हाती घेतलेले काम पूर्णत्वाला नेणारा माणूस अशी त्यांची प्रतिमा आहे.



स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर कार्यकर्त्यांना पदांचे टॉनिक दिले जाईल. भाजपचे पालकमंत्री नसलेल्या जिल्ह्यांमध्ये प्रदेशाध्यक्ष बावनकुळे यांनी भाजपचे संपर्कमंत्री नेमले आहेत. त्यामुळे आपला पालकमंत्री नसलेल्या जिल्ह्यात भाजपच्या कार्यकर्ते, नेत्यांना एक हक्काचे दार मिळाले आहे.

सत्तेचा उपयोग पक्षासाठी कसा करून घ्यायचा, याची पद्धतशीर आखणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली आहे. पक्ष आणि सरकारच्या माध्यमातून ती अमलात आणली जात आहे. प्रत्येक भाजप मंत्र्याला प्रदेश कार्यालयात महिन्यातून एकदा जनता दरबार घेणे अनिवार्य करण्यात आले आहे.

महामंडळे आणि विविध समित्यांवरील नियुक्ती तिन्ही पक्षांकडून स्थानिक स्वराज्य संस्थांचे पडघम वाजू लागण्याच्या आधी केली जाईल, असे दिसते. कार्यकर्त्यांना पदे, तर हवीच आहेत; पण सत्तेचे बोट धरून मिळणारे आर्थिक लाभही हवे आहेत. नेत्यांना ते मिळतच असतात, मग कार्यकर्त्यांनी काय घोडे मारले?

नेते आणि कार्यकर्ते या दोन्हींच्या मध्ये आठ-दहा जण महाराष्ट्रात असे आहेत की, जे वर्षानुवर्षे पक्षसंघटनेतच राबले, त्यांना सत्तेत पद मिळाले नाही. त्यांच्याबद्दल बावनकुळे काही बोलत नाहीत. त्यात माधव भंडारी, सुनील कर्जतकर, दिनेश सूर्यवंशी, लक्ष्मण सावजी, रघुनाथ कुलकर्णी, उपेंद्र कोठेकर, किरण पातूरकर, शहाजी पाटील, संजय भेंडे, केशव उपाध्ये, शिरीष बोराळकर, मुकुंद कुलकर्णी, डॉ. राजेंद्र फडके, वासुदेवनाना काळे, भरत पाटील, नीता केळकर असे काही जण आहेत. बरेच जण यांच्यामागून आले आणि पुढे गेले.

अनेकांचे व्यवसाय पक्षाच्या भरवशावर फुलले. विश्वास बसणार नाही, असे साम्राज्य त्यांनी उभे केले. हे मात्र, 'मेरा नंबर कब आयेगा' म्हणत वाट पाहत आहेत. आता पाच वर्षे सत्ता आहे, भरपूर पदे वाटायची आहेत, प्रतीक्षा संपायला हरकत नाही.

भाजपच्या सदस्य नोंदणीचे दीड कोटीचे लक्ष्य पूर्ण करण्यासाठी एक महत्त्वाची बैठक तीन दिवसांपूर्वी मुंबईत झाली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष बावनकुळे हजर होते. काही आमदार मुंबईत असूनही बैठकीला गेले नाहीत. मुख्यमंत्र्यांनी ही बाब खूपच गांभीर्याने घेतली. मुंबईत आहेत; पण बैठकीला आलेले नाहीत अशा आमदारांवर प्रदेशाध्यक्ष कारवाई करतील, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. मुख्यमंत्र्यांची अपेक्षा म्हणजे आदेशच असे समजून बावनकुळे काय कारवाई करतात ते दिसेलच. एक कोटी सदस्यसंख्या झाली आहे, ५० लाख बाकी आहेत, जे आमदार त्यांना दिलेला कोटा पूर्ण करणार नाहीत ते रडारवर असतील.

# कामे मार्गी लावा अन्यथा खुर्च्या रिकाम्या करा

## आमदार काशिनाथ दाते सर

**पारनेर (दै. आरंभ पर्व)**

सर्वसामान्य जनतेच्या पाठिंब्यमुळे मी आमदार झालो असून गेली चाळीस वर्षापासून मी समाजकारण करत आहे . मागील पाच वर्षांमध्ये सर्वसामान्य जनतेला पोलीस व महसूल प्रशासनाकडून वेठीस धरण्याचे काम चालू होते मात्र या पुढील काळामध्ये जनतेची कामे ही मार्गी लावावीच लागतील. कुठल्याही विभागाच्या अधिकाऱ्यांनी कामामध्ये दिरंगाई न करता ताबडतोब मार्गी लावावीत लागतील तसे न झाल्यास आपणास खुर्च्या रिकाम्या कराव्या लागतील अशी तंबीच अधिकाऱ्यांना आमदार काशिनाथ दाते सर यांनी दिली आहे.

पारनेर तालुक्यातील शिरापूर येथील खामकरवाडी येथे आमदार काशिनाथ दाते सर यांच्या आमदार निधीतून १५ लक्ष रुपयांचा निधी कानिफनाथ मंदिर येथे सभामंडप उभारणीसाठी निधी मंजूर करण्यात आला असून या सभामंडपाचे भूमिपूजन कार्यक्रम प्रसंगी आमदार दाते सर बोलत होते.

या सभामंडप उभारणी कामाचे भूमिपूजन दाते सर यांच्या हस्ते नुकतेच करण्यात आले या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राष्ट्रवादीचे नेते सुजितराव झावरे पाटील होते.

या कार्यक्रम प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून ह .भ.प. बाबा महाराज खामकर भाजपचे तालुकाध्यक्ष राहुल पाटील शिंदे, राष्ट्रवादीचे उपजिल्हाध्यक्ष रखमाजी कापसे सर, युवा नेते सचिन पाटील वराळ, मा. नगराध्यक्ष विजय औटी , ज्येष्ठ नेते वसंत चेडे, राष्ट्रवादी महिला तालुकाध्यक्ष सुषमाताई रावडे, सरपंच पंकज कारखिले, उपसरपंच दत्ता नाना पवार आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी आमदार दाते म्हणाले की, आपणाला पारनेर तालुक्यातील जनतेने मनापासून साथ दिली व तालुक्याचा लोकप्रतिनिधी म्हणून काम करण्याची संधी दिली या संधीमुळेच आपण तालुक्यातील गावोगावच्या विकास कामे यांना गती देऊन जनतेचे प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्नशील आहे.जनतेने साथ दिल्याने आपण कोट्यावधी रुपयाचा निधी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या व शासनाच्या माध्यमातून आणणार असून यामुळे गावोगावच्या रस्ते पाणीपुरवठा आरोग्याच्या सुविधा शाळांच्या सुविधांचे प्रश्न मार्गी लागणार आहेत. तालुक्यातील शेतीच्या व पिण्याच्या पाण्याचा प्रश्न कायमस्वरूपीचा मिटवण्यासाठी जलसंपदा विभागाच्या मार्फत सर्व योजनांचे सर्वेक्षणाचे काम चालू असून तालुक्यात योजना मोठ्या प्रमाणात आणायच्या असून राहिलेली अपुरे कामे सुद्धा मोठ्या प्रमाणावर निधी आणून आपण पूर्ण करणार आहे असेही आमदार दाते यांनी बोलताना सांगितले.

या कार्यक्रमास प्रसंगी डॉ. सचिन खामकर, संतोष शिनारे, आदिनाथ खामकर, शिवाजी पानमंद, दत्तात्रय पानमंद, भास्कर बेलकर, रामदास खामकर, मंगेश वाळून , पप्पू दाते, अंकुश थोरात आदी ग्रामस्थांसह परिसरातील महायुतीचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## कामचुकारपणा करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या बदल्या करा

**गेल्यावर पाच वर्षात तालुक्यातील नागरिकांच्या प्रश्नाला पोलीस व महसूल कर्मचाऱ्यांनी कायमच केराची टोपली दाखवली असून वरिष्ठांच्या आदेशानुसारच कर्मचारी कामकाज करत होते. यामुळे तालुक्यातील नागरिकांना मोठा मनस्ताप सहन करावा लागत होता. तालुक्यातील एखाद्या नागरिकाला पोलीस स्टेशन मध्ये एन. सी दाखल करावयाची असल्यास लोकप्रतिनिधीला फोन लावावा लागतो ही बाब दुर्दैवी आहे. पारनेर पोलिसांकडून चोराला सुट्टी व संन्याशाला फाशी अशी अवस्था या विभागाची झाली आहे..? महसूल विभागामध्येही सर्वसामान्य नागरिकाला शिधापत्रिका काढण्यासाठी एक वर्षांचा कालावधी लागतो हा विभाग सर्व दलालांचा बाजार झाला असून वरिष्ठ अधिकारी या कर्मचाऱ्यांना खतपाणी घालत अजून या विभागातील कर्मचाऱ्यांच्या बदल्या लवकरात लवकर कराव्यात अशी मागणी युवक राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष व शिरापूर गावचे सरपंच भास्कर उचाळे यांनी व्यक्त केली आहे.**

# थोडक्यात




## सिंजेंटातर्फे राष्ट्रीय परिषद संपन्न

**पुणे (आरंभ पर्व) : सिंजेंटा इंडियाने नुकतेच नेमाटोड मॅनेजमेंट इन ॲग्रीकल्चर (पिकातील सुत्रकृमींच्या प्रादुर्भावाचे व्यवस्थापन) या विषयावर एक दिवसीय राष्ट्रीय परिषद आयोजित केली. अशा प्रकारच्या पहिल्याच उपक्रमामध्ये देशभरातील 100 हून अधिक कृषी शास्त्रज्ञ उपस्थित होते.या परिषदेमध्ये सुत्रकृमींचा झाडांच्या मुळांवर होणारा प्रादुर्भाव व त्याचे परिणाम,मुळांवर हल्ला करणारे अतिसुक्ष्म कृमी ज्यामुळे वाढ खुंटते, उत्पादकता घटते आणि रोगांची शक्यता वाढते.त्यामुळेच मातीचे आरोग्य जपण्यासाठी,पीक उत्पादकता टिकून ठेवण्यासाठी आणि रसायनांचा वापर कमी करण्यासह नेमाटोडचे व्यवस्थापन गरजेचे असल्याचे मत तज्ञांनी व्यक्त केले. सिंजेंटा इंडियाचे देशातील प्रमुख आणि व्यवस्थापकीय संचालक सुशील कुमार म्हणाले की,महत्त्वाच्या संसाधनांचे रक्षण करताना आपल्याला आवश्यक असलेले धान्य पिकविण्याच्या प्रयत्नांमध्ये शेतकरी हा केंद्रबिंदू आहे.आमचे तंत्रज्ञान कृषी क्षेत्रातील प्रमुख आव्हानांना तोंड देण्यासाठी सक्षम असून अभिनवतेमुळे उत्पादकतेमध्ये लक्षणीय वाढ होत आहे.कृषी क्षेत्रात परिवर्तन घडवून आणण्यासाठी उद्योग आणि शैक्षणिक संस्थांमधील सहयोग आवश्यक आहे.**

## आरओ प्लांटला तूर्त टाळेच, महापालिकेने घेतली व्यावसायिकांची बैठक

**पुणे (आरंभ पर्व) : धायरी परिसरातील आरओ प्रकल्पातील पाण्यात गुलियन बॅरी सिंड्रोमसाठी (जीबीएस) कारणीभूत असणारा जिवाणू आढळल्याने त्यांना टाळे ठोकले आहे. ही कारवाई मागे घेण्यासाठी आज महापालिकेत प्रकल्पचालकांची बैठक झाली. यामध्ये महापालिकेने या कंपनीने मशिन बसविले आहे त्यांच्याकडून देखभाल दुरुस्ती करून घ्यावी, जागतिक आरोग्य संघटनेच्या मानांकनानुसार पाणी दिले जाईल याचे प्रमाणपत्र द्यावे त्यानंतरच टाळे काढले जाईल असे सांगण्यात आले आहे. महापालिकेने धायरी, नांदेड, किरकटवाडी परिसरातील ३० आरओ प्रकल्पांतील पाणी पिण्यास अपायकारक असल्याने महापालिकेने त्यांना टाळे ठोकले होते. हे टाळे महापालिकेने काढावे यासाठी राजकीय दबाव आणला होता, पण महापालिकेने त्यास दाद दिली नाही. त्यानंतर प्रकल्प चालकांची अधिकाऱ्यांनी महापालिकेत (ता. ७) बैठक घेतली आहे. प्रकल्पचालकांचे म्हणणे घेऊन घेण्यात आले. त्यानंतर महापालिकेने जर आरओ प्रकल्प पुन्हा सुरू करायचे असल्यास ज्या कंपनीची यंत्रणा आहे ती पुन्हा तपासून घ्यावी, तसेच प्रकल्पाच्या ठिकाणी पाणी शुध्द करण्यासाठीची ( क्लोरिनेशन ) स्वतंत्र यंत्रणा उभारावी. या दोन्ही अटींचे हमीपत्रही महापालिकेकडून घेतले जाणार असून त्याचे उल्लंघन झाल्यास संबंधित प्रकल्प कायमचा बंद केला जाणार असल्याची तंबी प्रकल्प चालकांना देण्यात आली आहे.**

# भीमाशंकर करंडकाचे विजेतेपद हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाकडे

## किरण खुडे



**राजगुरुनगर (दै. आरंभ पर्व)**

डी. जी. फाऊंडेशन आयोजित आंतरमहाविद्यालयीन भीमाशंकर करंडक स्पर्धा नुकतीच मंचर येथे संपन्न झाली. या स्पर्धेच्या विजेतेपदाचा करंडक येथील खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाने पटकाविला. राज्याचे माजी मंत्री दिलीप वळसे पाटील, सिने अभिनेता आकाश ठोसर, पूर्वा वळसे पाटील यांच्या हस्ते आकर्षक करंडक आणि रोख ५१ हजारांचे बक्षीस देऊन महाविद्यालयाचा गौरव करण्यात आला.

भीमाशंकर करंडकांतर्गत एकांकिका स्पर्धेत राजगुरू महाविद्यालयातील प्रवास महत्त्वाचा आहे - सुखाचा शोध या एकांकिकेचा प्रथम क्रमांक आला. उत्कृष्ट दिग्दर्शक व उत्कृष्ट अभिनेता अवधूत धायबर तर उत्कृष्ट नेपथ्यकार म्हणून हर्षल गेडाम यांना गौरविण्यात आले. वैयक्तिक नृत्य स्पर्धेत प्रथम क्रमांक आदित्य हानवटे, गीतगायन स्पर्धेत द्वितीय क्रमांक कृतिका वाळुंज आणि वैयक्तिक नृत्य स्पर्धेत तृतीय क्रमांक प्रचिती नेटके यांनी पटकाविला. भीमाशंकर करंडक स्पर्धा जिंकून देण्यात महत्त्वाची भूमिका बजावलेल्या प्रचिती नेटके, सूरज पावडे, श्वेता धवसे, हर्षल गेडाम, अवधुत धायबर या विद्यार्थ्यांसह बक्षीसप्राप्त विद्यार्थ्यांचे आणि सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. दिलीप मुळूक, प्रा. अर्चना खांडेभराड यांचे विशेष कौतुक संस्थाध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, यांच्यासह संचालक बाळासाहेब सांडभोर, हिरामण सातकर, ॲड. राजमाला बुट्टेपाटील, प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, उपप्राचार्य डॉ. व्ही.डी. कुलकर्णी, डॉ. संजय शिंदे, प्रा. व्ही.बी. दौंडकर, प्रबंधक के. आर पाचारणे यांनी केले.

भीमाशंकर करंडक मिळवून देणाऱ्या विद्यार्थ्यांचा संस्थेच्या वतीने सत्कार करण्यात आला. या वेळी बोलताना संस्थाध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील यांनी गुणवंत विद्यार्थ्यांचे कौतुक करताना संस्था व महाविद्यालयाच्या नावलौकिकात भर घालण्याचे काम केल्याबद्दल सर्व विद्यार्थी कौतुकास पात्र असल्याचे ते म्हणाले.

# ज्ञानाची खोली, अनुभवाचे संचित मिळवण्यासाठी शिकत रहा

## लक्ष्मण साबळे

- **सीए भरत फाटक यांचा सल्ला**
- **'आयसीएआय'च्या दीक्षांत सोहळ्यात ११०० स्नातकांना पदवी प्रदान**




**पुणे (दै. आरंभ पर्व)**

"शिक्षण ही अविरत सुरू राहणारी प्रक्रिया आहे. त्यामुळे सनदी लेखापाल ही पदवी हा एक टप्पा आहे, असे मानून ज्ञानाची खोली आणि अनुभवाचे संचित मिळवण्यासाठी आपल्या ज्ञानशाखेशी संबंधित विशेष प्राविण्य प्राप्त करत राहावे," असा सल्ला ज्येष्ठ सनदी लेखापाल, वेल्थ मॅनेजर्स इंडिया प्रायव्हेट लिमिटेडचे संस्थापक भरत फाटक यांनी विद्यार्थ्यांना दिला.

दी इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंटंट्स ऑफ इंडियाच्या (आयसीएआय) पुणे शाखेच्या वतीने आयोजित दीक्षांत सोहळ्यात प्रमुख अतिथी म्हणून फाटक बोलत होते. म्हात्रे पुलाजवळील सिद्धी बॅन्क्वेट येथे आयोजित सोहळ्यात भरत फाटक व आर्थिक सल्लागार सीए रचना रानडे यांच्या हस्ते ११०० स्नातकांना सीए (सनदी लेखापाल) पदवी प्रदान करण्यात आली. प्रसंगी 'आयसीएआय'च्या केंद्रीय समितीचे सदस्य सीए चंद्रशेखर चितळे, सीए उमेश शर्मा, विभागीय समिती सदस्य सीए ऋता चितळे, 'आयसीएआय पुणे'च्या अध्यक्षा सीए अमृता कुलकर्णी, उपाध्यक्ष सीए सचिन मिणियार, सचिव सीए हृषीकेश बडवे, कार्यकारिणी सदस्य सीए प्रणव आपटे, सीए प्रितेश मुनोत, सीए राजेश अग्रवाल आदी उपस्थित होते.

सीए भरत फाटक यांनी स्नातकांना व्यावसायिक जीवनाचे कानमंत्र सांगितले. "सनदी लेखापाल हा अतिशय वैशिष्ट्यपूर्ण अभ्यासक्रम आहे. इतर व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश अवघड असतो, पण सीए अभ्यासक्रमातून बाहेर पडणे, अवघड असते. एका टप्प्यापर्यंतचा तुमचा प्रवास आणि विशिष्ट अभ्यासक्रमाचा पाठपुरावा आता पूर्ण झाला आहे. तुम्ही आता व्यावसायिक जीवनाचा प्रारंभ करणार आहात. मात्र, शिक्षण कधीच संपत नसते. शिवाय व्यावसायिक आयुष्यात तुम्ही प्रतिदिवशी काही ना काही शिकतच असता. त्यामुळे सतत शिकत राहिले पाहिजे," असे त्यांनी नमूद केले.

सीए रचना रानडे म्हणाल्या, "सनदी लेखापाल म्हणून व्यावसायिक जीवन सुरू करतानाही, आपण वाचत राहावे. नवे ज्ञान, तंत्रज्ञान, कौशल्ये आत्मसात करावीत. करनियोजन हे फक्त आयकर आणि अप्रत्यक्ष करांपुरते मर्यादित नाही, हे समजून घ्या. आपल्या देशातील महागाई हा सर्वांत मोठा आणि गंभीर स्वरुपाचा कर आहे, याची जाणीव ठेवा. महागाईवर मात करण्यासाठी निश्चित आणि नेमकी धोरणे आखून काम करा. अर्थव्यवस्थेशी संबंधित विविध पर्यायांचा अभ्यास करा. त्या क्षेत्रात तज्ज्ञता मिळवून करिअरचा मार्ग अधिक व्यापक करा."

सीए चंद्रशेखर चितळे म्हणाले, "समानतेच्या आजच्या युगात ३० टक्के स्नातक विद्यार्थिनी आहेत, याचा अतिशय आनंद आणि अभिमान वाटतो. तुम्ही सारे नव्या युगाचे प्रतिनिधी आहात. जागतिक पातळीवर ऑडिटच्या संधी तुमच्यासमोर आहेत. युरोप, कॅनडा, सिंगापूरसह सारे जग कामासाठी खुले आहे. सदैव परस्परांच्या संपर्कात राहा, स्मार्ट काम करा आणि उत्कृष्ट कामाने स्वतःचा चिरस्थायी असा प्रभाव निर्माण करा. भारतीय सनदी लेखापालांच्या दर्जाविषयी जगभरात अतिशय गौरवपूर्ण बोलले जाते. तो लौकिक कायम राखा."

सीए उमेश शर्मा यांनी दर्जा, सातत्य आणि नैतिकता ही त्रिसूत्री जपण्याचे आवाहन केले. पदवी मिळणे, हा फक्त एक टप्पा आहे. खरी परीक्षा व्यावसायिक जीवनात समोर येणार आहे. त्यामुळे अभ्यासाची सवय कायम ठेवा. कामातील अचूकता जपा. कृत्रिम बुद्धीमत्तेसह अन्य तांत्रिक, यांत्रिक कौशल्ये काळानुसार आत्मसात करा", असे शर्मा म्हणाले.

सीए ऋता चितळे यांनी मनोगत मांडले. सीए चंद्रशेखर चितळे यांनी सर्व स्नातकांना शपथ दिली. सीए अमृता कुलकर्णी यांनी स्वागतपर प्रास्ताविक केले. सीए सारिका दिंडोकर व सीए प्रणव मंत्री यांनी सूत्रसंचालन केले. सीए सचिन मिनियार यांनी आभार मानले.



## "शेअर बाजार हा समजून घेतला, तर दीर्घ समृद्धीकडे जाणारा एक मार्ग आहे!"

**(दै. आरंभ पर्व)**

मार्केट: भारताच्या शेअर मार्केटमध्ये केवळ ३% लोक गुंतवणूक करतात, त्यात महाराष्ट्राचा पहिला क्रमांक असला तरी मराठी गुंतवणूकदारांची संख्या अत्यल्प आहे. शेअर बाजारात ८०% हून अधिक गुंतवणूक गुजराती, मारवाडी, जैन, पारशी आणि सिंधी समाजाचा सहभाग आहे. याचा अर्थ शेअर मार्केट आहे महाराष्ट्रात, पण मराठी माणूस त्यात फारसा नाही! मराठी बांधवांनी शेअर मार्केटमध्ये जागरूकता निर्माण करून स्वतःची आर्थिक उन्नती साधावी, यासाठीच आम्ही ही लेखमाला सुरू करत आहोत.

टप्पा १: सुरुवातीला "शेअर मार्केट फॉर बिगिनर्स" या संकल्पनेतून लेख प्रकाशित होतील. तुम्हाला कोणत्या विषयावर वाचायला आवडेल? कंमेंटमध्ये कळवा, आम्ही त्यानुसार प्राधान्यक्रम ठरवू.

टप्पा २: पुढच्या टप्प्यात SEBI नोंदणीकृत व तज्ञ सल्लागारांच्या सहाय्याने "शेअर मार्केट ॲडव्हान्स्ड" ही लेखमालिका सुरु करण्यात येईल.

मोफत वाचन संधी: हे लेख निःशुल्क आपल्या वृत्तपत्र, मासिक किंवा पोर्टलवर प्रकाशित करण्यास हरकत नाही. यासाठी कोणतेही मानधन घेतले जाणार नाही.

व्हॉट्सॲप अपडेटस मिळवा! : शेअर मार्केट लेखमाला थेट आपल्या व्हॉट्सॲपवर मिळण्यासाठी जिल्हानिहाय ब्रॉडकास्ट लिस्ट तयार करत आहोत. इच्छुकांनी नाव, व्हॉट्सॲप नंबर आणि आपल्या जिल्ह्याचे नाव prakaashbhosale@gmail.com या ईमेल ॲड्रेसवर पाठवावे.

**- प्रकाश भोसले**

# ॲड. प्रसन्नदादा जगताप यांच्या वाढदिवसानिमित्त विविध उपक्रम

**पुणे(दै. आरंभ पर्व)**

पुणे महानगरपालिकेचे माजी उपमहापौर, सिंहगड रोड नगरीचे शिल्पकार ॲड. प्रसन्नदादा जगताप यांच्या वाढदिवसांनिम्मित विविध सामाजिक उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

हिंगणे चौक, नगरसेवक ॲड. श्री. प्रसन्नदादा जगताप यांच्या संपर्क कार्यालयासमोर, सिंहगड रोड, हिंगणे येथे विविध कार्यक्रमांचे नियोजन करण्यात आले आहे.

या निमित्त भारती विद्यापीठ मेडिकल फाउंडेशन आणि डॉ. दुधभाते नेत्रालय व रेटिना सेंटर यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत महाआरोग्य तपासणी शिबिराचे घेण्यात येणार आहे .

ह्या शिवाय नागरिकासाठी सिंहगड फेस्टिव्हल २०२५ अंतर्गत खरेदी, संगीत आणि मनोरंजनाचा अनोखा अनुभव घेण्याची संधी उपलब्ध होणार आहे.



मोफत महाआरोग्य तपासणी शिबीर, रक्तदान शिबिर

नगरसेवक ॲड. श्री. प्रसन्नदादा जगताप, भारती विद्यापीठ मेडिकल फाउंडेशन आणि डॉ. दुधभाते नेत्रालय व रेटिना सेंटर यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत महाआरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

मोतिबिंदू शस्त्रक्रिया (महात्मा फुले जनआरोग्य योजना/शहरी गरीब आरोग्य योजना अंतर्गत मोफत), नेत्र तपासणी व मोफत चष्मे वाटप, नाक, घसा, कान तपासणी,दंत तपासणी,बीपी/ शुगर तपासणी,महिलांसाठी स्वतंत्र तपासणी कक्ष,रक्तदान शिबिर हे

आरोग्य उपक्रम १० फेब्रुवारी २०२५ सकाळी १० ते दुपारी २

स्थळ: हिंगणे चौक, नगरसेवक ॲड. श्री प्रसन्नदादा जगताप यांच्या संपर्क कार्यालयासमोर, सिंहगड रोड, पुणे येथे होणार आहेत.

### बुके ऐवजी शालेय साहित्य स्वीकारणार !

**ॲड. प्रसन्नदादा जगताप हे वाढदिवसाच्या निमित्त येणाऱ्या नागरिक व मित्रमंडळी , कार्यकर्त्यांकडून बुके ऐवजी शालेय साहित्य स्वीकारणार आहेत. हे सर्व साहित्य गरजू गोरगरीब विद्यार्थ्यांना वाटप करण्यात येणार आहे. आपल्या सर्वांची उपस्थिती हीच आमच्यासाठी अनमोल भेट असेल.**

**- ॲड. प्रसन्नदादा जगताप, माजी उपमहापौर**

सिंहगड फेस्टिव्हल २०२५

ॲड . प्रसन्नदादा जगताप यांच्यावर प्रेम करणाऱ्या तसेच सर्व नागरिकांसाठी वाढदिवसाच्या निमित्त सिंहगड फेस्टिवलच्या आयोजन करण्यात आले आहे.

ह्यामध्ये नागरिकांना विविध वस्तू खरेदी, मनोरंजक संगीत आणि मस्ती धमाल हे सर्व एकाच छताखाली अनुभवास मिळणार आहे. तसेच कुटुंबासाठी मनोरंजन, सांस्कृतिक कार्यक्रम यांचेही भव्य दिव्य आयोजन करण्यात आले आहे.

ॲड . प्रसन्ना दादा जगताप यांना वाढदिवसाच्या निमित्त शुभेच्छा देण्यासाठी अभिष्टचिंतन सोहळ्याचे ही आयोजन करण्यात आले आहे. हा सोहळा सायंकाळी चार वाजल्यापासून सुरू होणार आहे.

ॲड. जगताप यांचा वाढदिवस म्हणजे नागरिकांसाठी पर्वणीच असते.. हजारो नागरिक त्यांना शुभेच्छा देण्यासाठी उपस्थित असतात.

# एसयूडी लाइफने एक नवीन उत्पादन लॉंच केले - एसयूडी लाइफ गॅरंटी रॉयल

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

एसयूडी लाइफने एसयूडी लाइफ गॅरंटी रॉयल लॉंच केली, ही एक नॉन-लिंक्ड, नॉन-पार्टिसिपेटिंग इंडिविजूअल सेविंग्ज योजना आहे, जी तुम्हाला आणि तुमच्या प्रियजनांना जीवनातील महत्त्वाचे टप्पे गाठण्यात मदत करताना हमीदार आर्थिक सुरक्षा देण्यासाठी तयार केली आहे. अशा जीवनाची कल्पना करा जिथे तुमची आर्थिक उद्दिष्टे, सुरक्षितता आणि निश्चिततेसह अखंडपणे सांभाळली जातील, जिथे तुम्ही तुमच्या प्रियजनांच्या गरजा आत्मविश्वासाने पूर्ण करू शकता, तुमची स्वप्ने साध्य करू शकता आणि जीवनाच्या अनपेक्षित वळणांवर संपूर्ण खात्रीने नेव्हिगेट करू शकता. एसयूडी लाइफ गॅरंटी रॉयल तुम्हाला हे स्वप्न प्रत्यक्षात आणण्यास मदत करते, ज्यामुळे तुम्हाला आर्थिक स्थिरतेसह चिंतामुक्त जीवन जगता येते. एसयूडी लाइफ गॅरंटी रॉयल ही केवळ पॉलिसी नसून, ही एक विचारपूर्वक तयार केलेली योजना आहे जी तुम्हाला तुमची आर्थिक उद्दिष्टे साध्य करण्यात मदत करण्यासाठी गॅरंटीड एकरकमी पेआउट आणि बचतीचे फायदे एकत्र करते. हे गॅरंटीड मॅच्युरिटी बेनिफिट ऑफर करते, ज्यामध्ये पॉलिसी टर्मच्या शेवटी गॅरंटीड ॲडिशन्स आणि मॅच्युरिटी लॉयल्टी ॲडिशन्ससह मॅच्युरिटीवर ॲश्युअर्ड समाविष्ट असते.

Star Union Dai-ichi Life Insurance
A joint venture of Bank of India | Union Bank of India | Dai-ichi Life

# सचिन गोपीनाथ तुपे पुरस्काराने सन्मानित

**लोणी काळभोर (दै. आरंभ पर्व)**

समाजातील विविध स्तरातील कार्य करणाऱ्या व्यक्तींना लोककल्याण साधना गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले त्यामध्ये पुणे जिल्ह्यातील कामगारांच्या समस्या सोडविण्यासाठी अग्रगण्य असलेले सचिन गोपीनाथ तुपे यांना लोक कल्याण श्रमसाधना गौरव पुरस्कार देऊन नुकतेच सन्मानित करण्यात आले .

संत नरहरी सोनार महाराजांचे २४ वे वंशज अथर्व महामुनी यांच्या हस्ते शाल ,श्रीफळ व मानचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले.

यावेळी लोककल्याण प्रतिष्ठाणचे अध्यक्ष राजाभाऊ होले,गुन्हे शाखा,पुणेचे पोलिस निरीक्षक युवराज हांडे ,सामाजिक कार्यकर्ते नितीन गावडे ,किर्तनकार ज्ञानदिप गायकवाड आदी उपस्थित होते . सचिन गोपीनाथ तुपे हे २००९ पासून कामगार प्रतिनिधी म्हणून काम करत आहेत . सर्व कामगारांना बरोबर घेऊन २००९ मध्ये कामगार युनियनची स्थापना केली . सर्व संमतीने सहमतीने त्यांची बिनविरोध संस्थापक अध्यक्षपदी निवड करण्यात आली . कामगारांच्या प्रमुख मागण्यांसाठी व त्या पुर्ण करण्यासाठी सचिन गोपीनाथ तुपे हे सतत कार्यरत असतात. कामगारांना पगार वाढ व सुमारे कंपनीतील हंगामी कामगारांना कायम करून घेण्याचे काम त्यांनी केले आहे .पुणे जिल्ह्यातील अनेक कंपन्यांशी ते जोडले गेले असून कामगारांच्या सोयी सुविधांसाठी सतत व्यवस्थापनेशी चर्चा करत असतात प्रत्येक कामगारांना दहा लाख रुपयांपर्यंत मेडिक्लेम तसेच कामावर येण्या जाण्यासाठी बसची सुविधा कॅन्टींग ची सुविधा इत्यादी प्रश्न त्यांनी मार्गी लावले.




# नऱ्हे भागातील नागरिकांच्या आरोग्याचेही सर्वेक्षण करा

- **भूपेंद्र मोरे यांचे पुणे महानगरपालिकेला आवाहन**
- **नऱ्हेतील नागरिकांनाही शुद्ध पाणीपुरवठा करण्याचीही मागणी!**
- **सामाजिक कार्यकर्ते भूपेंद्र मोरे यांची मनपाकडे मागणी**



**नऱ्हे (दै. आरंभ पर्व)**

गूलेन बॅरो सिंड्रेम अर्थात जीबीएस आजाराचा प्रादुर्भाव दिवसेदिवस वाढत आहे.. सिंहगड रोड भागातील महत्त्वाचे गाव असलेले नऱ्हेगावास ही जीबीएस चा धोका आहे. ही बाब लक्षात घेता नऱ्हेवासियानाही स्वच्छ पाणीपुरवठा करण्यात यावा व या भागातील नागरिकांच्या आरोग्य सर्वेक्षण ही करण्यात यावे .अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते भूपेंद्र मोरे यांनी पुणे महानगरपालिकेकडे केली आहे.

नऱ्हे हे जीबीएस ग्रस्त भागात मोडते.मात्र सध्या पेशंट नसले तरीही धोका कायम आहे. त्यामुळे या भागातील नागरिकांना क्लोरीनयुक्त शुद्ध पाणीपुरवठा करण्यात यावा. अशी मागणीही त्यांनी पुणे महानगरपालिकेकडे केली आहे.

महानगरपालिका आता काय निर्णय घेणार हे पहाणे आता महत्त्वाचे ठरणार आहे.

### उपमुख्यमंत्र्याकडे प्रलंबित विषय मांडणार

**ह्या भागाच्या विकासात्मक धोरणे आणि विकास कामासंबधित राज्याचे कर्तव्यदक्ष उपमुख्यमंत्री अजितदादा पवार सातत्याने पाठपुरावा सुरू आहे. ह्या माध्यमातून नऱ्हेभागातील विविध प्रलंबित विषय सोडवण्याचा आपला प्रयत्न आहे. सध्या दोन कोटी रुपयांची ड्रेनेजची कामे सुरू आहेत. ह्या कामानंतर उर्वरित कामेही लवकरच सुरू होणार आहेत. असेही मोरे यांनी दै. आरंभपर्वशी बोलताना सांगितले.**

दैनिक आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com
WE ARE HIRING !
Open Position
VIDEO EDITOR
आपला बायोटाडा खालील ईमेलवर पाठवावा.
for Video Editor असा स्पष्ट उल्लेख करावा.
aparvinfo@gmail.com & ganganepratik4@gmail.com
Call Now ७२७६३१४१४२

दैनिक आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
वार्ताहर नेमणे आहे
पुणे आणि जिल्ह्यात लोकप्रिय दै.आरंभ पर्वसाठी खालीलप्रमाणे जिल्हा व तालुकास्तरावर वार्ताहर नेमणे आहेत.
सिंहगड रोड भागातील जनतेचा आवाज.. इथं आहे जनहिताचे सर्व आरंभपर्व
पुणे जिल्हा
इंदापूर शहर, इंदापूर ग्रामीण, बारामती, उरुळी कांचन, यवत, केडगाव, सुपा, भिगवण, सासवड, पुरंदर,जेजुरी, नीरा, सोमेश्वर, माळेगाव, भोर, वेल्हा. चाकण, राजगुरूनगर, मंचर, जुन्नर, घोडेगाव, लोणी काळभोर
पुणे शहर
धायरी, स्वारगेट, हडपसर, कॅम्प, वडगाव बुद्रुक, पर्वती, डेक्कन, सिंहगड रोड, कात्रज, कोंढवा
इच्छुकांनी आपला बायोडाटा खालील ई-मेल वर पाठवावा.
aparvinfo@gmail.com
वार्ताहरांना मिळणाऱ्या सुविधा
आयडीकार्ड, नियुक्तीपत्र, युट्युबसाठी लागणारा माईक
(टीप - वरील गोष्टी देण्यापूर्वी किमान एक महिने काम करणे आवश्यक. आपले काम बघून पुढील निर्णय घेतला जाईल.)
दै.आरंभपर्व मीडिया समूह 7276314142 / 9284559577 / 8605284272

# "क्रिएटिव्हिटी क्लब - शिक्षक समुदाय निर्माण कार्यक्रम" यशस्वीपणे संपन्न



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

प्रथम संस्थेच्या वतीने "क्रिएटिव्हिटी क्लब - शिक्षक समुदाय निर्माण कार्यक्रम" पुण्यात यशस्वीपणे संपन्न झाला. या कार्यक्रमात विविध शाळांमधील शिक्षक, शाळा व्यवस्थापन प्रतिनिधी आणि शिक्षण तज्ज्ञ सहभागी झाले होते. या उपक्रमाचा उद्देश शिक्षकांचे योगदान साजरे करणे, त्यांना एकत्रित आणून सृजनशील शिक्षणाबाबत चर्चा घडवणे आणि त्यांच्या अनुभवांचे आदान-प्रदान करण्यासाठी एक व्यासपीठ उपलब्ध करून देणे हा होता.

क्रिएटिव्हिटी क्लब बद्दल थोडक्यात : क्रिएटिव्हिटी क्लब हा प्रथम संस्थेचा शालेय विद्यार्थ्यांसाठी उपक्रम असून, तो संपूर्ण भारतातील १३,००० हून अधिक गावे/वस्त्या आणि २,००० शाळांमध्ये कार्यरत आहे. आजपर्यंत १.२५ लाख विद्यार्थी, २०,०००+ युवक स्वयंसेवक आणि २,०००+ शिक्षक या उपक्रमाचा भाग झाले आहेत. सध्या पुण्यात २४९ शाळांमध्ये क्रिएटिव्हिटी क्लब सुरू असून २२८ शिक्षक या उपक्रमात सहभागी आहेत.

कार्यक्रमाची सुरुवात प्रथमच्या क्रिएटिव्हिटी क्लब उपक्रमाच्या परिचयाने झाली. त्यानंतर शिक्षकांच्या योगदानाची दखल घेत, त्यांचे अनुभव आणि यशोगाथा सामायिक करण्यासाठी एक विशेष पॅनेल चर्चा आयोजित करण्यात आली. यामध्ये शिक्षणतज्ज्ञ डॉ. दत्तात्रय तपकीर, DIET प्राचार्य सौ. वैशाली बच्चाव, मुख्याध्यापक श्री दराडे . सौ एकता दीक्षित आणि अनुभवी शिक्षका सौ. सारिका भोसले आणि भाग्यश्री मोरे यांनी भाग घेतला. प्रसंगी क्रिएटिव्ह क्लब प्रमुख स्मिया चंदन, डिजिटल कंटेंट प्रमुख नील पाठक उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या शेवटी शिक्षकांचा सत्कार करण्यात आला तसेच त्यांच्या योगदानाची दखल घेत त्यांना स्मृतिचिन्हे प्रदान करण्यात आली. सहभागी शिक्षकांनी या उपक्रमामुळे त्यांच्या अध्यापन पद्धतीत सकारात्मक बदल कसा झाला, याबाबत आपले अनुभव सांगितले.

कार्यक्रमाची यशस्वी अंमलबजावणी : या कार्यक्रमाला विविध शाळांमधील शिक्षक, शालेय व्यवस्थापन समितीचे सदस्य आणि शिक्षण तज्ज्ञांचा उत्तम प्रतिसाद लाभला. प्रथम संस्थेच्या वतीने भविष्यातही असे कार्यक्रम राबवण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला. प्रथम संस्थेच्या क्रिएटिव्हिटी क्लब उपक्रमाने आजपर्यंत लाखो विद्यार्थ्यांना आणि शिक्षकांना प्रेरित केले आहे. भविष्यात अधिकाधिक शाळा आणि शिक्षकांना या उपक्रमात सहभागी करून सृजनशील शिक्षणाला नवी दिशा देण्याचा मानस आहे.

### कार्यक्रमातील महत्त्वाचे मुद्दे

- सृजनशील शिक्षण आणि त्याचे विद्यार्थ्यांवर होणारे परिणाम
- शिक्षक आणि शाळांची नवीन शिक्षण पद्धतींसाठी तयारी
- भविष्यातील क्रिएटिव्हिटी क्लबचा शालेय शिक्षणातील महत्त्वाचा वाटा

## आनंदमार्ग शिबिर आजपासून सुरु

**पुणे(दै. आरंभ पर्व)**

आनंदमार्ग शिबिर दुगड फार्म जैन मंदिर, कात्रज येथे फेब्रुवारी ७, ८, ९ तारखेस आयोजित करणेत येत आहे. आनंदमार्ग हा सामाजिक व आध्यात्मिक विचार देते. येथे ध्यान, धारणा, योग, किर्तन व अन्य क्लासेस घेण्यात येणार आहे. आनंदमार्ग तर्फे आचार्य संपूर्णानंद उपस्थित राहतील. यामध्ये १०० ते १५० प्रतिस्पर्धी भाग घेतील व ते प्रशिक्षण देणार आहेत. येथे निःशुल्क भोजन व्यवस्था आहे. तसेच ३ तास किर्तन होईल. किर्तन :- आता हे किर्तन कोणाचे करायचे? तर हे किर्तन हरीचे करायचे. हरि म्हणजे कोण? 'हरति पापाणी इत्यर्थ हरि' जो आपले पाप हरण करतो तो हरि. जी व्यक्ति मनोभावे, श्रध्दापूर्वक किर्तन करेल त्याचे पाप हरि हरण करतोच. किर्तनाने मन शुध्द पवित्र होऊन सकारात्मक विचार येतो.

नारदमुनि सांगतात, 'मदभक्ता यत्र गायन्ति तत्र तिष्ठामी नारदः 'श्रेय आणि प्रेय''श्रेय आणि प्रेय' कृष्ण यजुर्वेद हे पुस्तक ब्रम्हविज्ञान आहे. त्यात एक प्रकरण 'कठोपनिषद' आहे. यामध्ये 'परा व अपरा, विद्या व श्रेय आणि प्रेय' यातील भेद व्यक्त केलेला आहे.

'श्रेय आणि प्रेय' पुर्णपणे परस्पर विरोधी शब्द आहेत. जरी ते परस्पर विरोधी असले तरी या दोघांचा एकाच वेळी मानवी मनावर परिणाम होताना दिसुन येतो.

## देशाच्या संरक्षण सज्जतेत निबे डिफेन्सचा मोलाचा वाटा : मुख्यमंत्री

### निबे लिमिटेडच्या सुसज्ज मिसाईल व स्मॉल आर्म्स कॉम्प्लेक्सचे उद्घाटन संपन्न

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

गेल्या दहा वर्षांमध्ये भारताने संरक्षण सज्जतेत मोठी झेप घेतली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सुरू केलेल्या मेक इन इंडियासारख्या योजनांचा योग्य लाभ घेऊन निबे डिफेन्स अँन्ड एअरोस्पेस कंपनी ने संरक्षण क्षेत्रातील विविध आयुधे व उपकरणे तयार करण्याच्या दृष्टीने अतिशय कमी वेळेत जोरदार वाटचाल केली आहे. यामध्ये कंपनीचे चेअरमन गणेश निबे यांच्या दूरदृष्टीचे प्रतिबिंब दिसून येत आहे.



देशाच्या संरक्षण सज्जतेत निबे डिफेन्स अँन्ड एअरोस्पेस मोलाचा वाटा उचलण्याचे काम करीत आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गुरुवार ६ फेब्रुवारी रोजी चाकण येथे केले. चाकण एमआयडीसीमधील निबे डिफेन्स अँन्ड एअरोस्पेस कंपनीच्या वर्धापन दिनानिमित्ताने सुसज्ज मिसाईल व स्मॉल आर्म्स कॉम्प्लेक्सचे उद्घाटन मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते फीत कापून करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून राज्याचे उपमुख्यमंत्री तथा पुण्याचे पालकमंत्री अजित पवार, महाराष्ट्राचे जलसंपदा मंत्री मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, उद्योग मंत्री उदय सामंत, भोसरीचे आमदार महेश लांडगे, निबे डिफेन्सचे चेअरमन गणेश निबे, सीईओ बालकृष्णन् स्वामी, एल अन्ड टी डिफेन्सचे व्हाईस प्रेसिडेंट अरुण रामचंदानी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते कंपनीचे रायगड गेटचे उद्घाटन करण्यात आले. तसेच छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचे पूजन, शिर्डीतील अम्युझमेंट पार्कचे उद्घाटनदेखील करण्यात आले. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांसह या वेळी उपस्थित पाहुण्यांनी कंपनीच्या नवीन कॉम्प्लेक्सची व निबे कंपनीच्या नव्या संरक्षण केंद्रांची पाहणी केली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना निबे डिफेन्सचे चेअरमन गणेश निबे यांनी कंपनीच्या आजवरच्या वाटचालीविषयी तसेच भविष्यातील घडामोडींविषयी उपस्थितांना माहिती दिली, तसेच निबे डिफेन्स नेहमीच देशाला संरक्षण क्षेत्रात बळकटी देण्याच्या दृष्टीने काम करेल. याशिवाय शासनाने निबे डिफेन्सला २५ एकर जमीन द्यावी, ज्यामध्ये आम्ही नव्या पिढीला संरक्षण क्षेत्रातील प्रशिक्षण तसेच आधुनिक ज्ञान देण्याचे कार्य करू शकू, असेही सांगितले.




दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.

# खासदारांनी श्रेय घेण्याचा केविलवाणा प्रयत्न करू नये - विक्रमसिंह कळमकर

**पारनेर (दै. आरंभ पर्व)**

पारनेर बसस्थानक येथे नवीन इमारतीसाठी महायुती सरकारने इमारत निधी उपलब्ध केला केला असुन तरी या कामाचे खासदारांनी श्रेय घेण्याचा केविलवाणा प्रयत्न सुरू आहे. हा विरोधकांचा हा प्रयत्न अतिशय लाजिरवाण आहे असा जोरदार हल्लाबोल राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे तालुकाध्यक्ष विक्रमसिंह कळमकर यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केला आहे.



राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष विक्रमसिंह कळमकर प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे की, प्रवाशांची सर्वात जास्त वर्दळ असणाऱ्या पारनेर बसस्थानकात आता नवीन सुसज्ज इमारत उभी राहणार आहे. या इमारतीसाठी निधी उपलब्ध करून द्यावा अशी मागणी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस , उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित दादा पवार , परिवहन मंत्री नामदार प्रताप सरनाईक यांच्याकडे विद्यमान आमदार काशिनाथ दाते सर यांनी केली होती.

परिवहन मंत्री नामदार प्रताप सरनाईक यांनी आमदार काशिनाथ दाते सर यांच्या मागणीची दखल घेऊन पारनेर बसस्थानकाच्या नवीन इमारतीसाठी २ कोटी ६६ लाख रुपयांचा निधीस मंजूरी देउन राज्य परिवहन महामंडळाकडून ही निविदा प्रक्रिया पूर्ण करण्यात आली आहेस.

पारनेर बस स्थानक इमारत बांधकाम भूमिपूजनाचा महाविकास आघाडीचे खासदार यांनी घाट बांधला असून या इमारत भूमिपूजनाचा अधिकार खासदारांना नाही. ज्या कामांचा काडीमात्र संबंध नाही अशा कामाचे श्रेय घेण्याचा खासदारांचा सुरू असलेला प्रयत्न लाजिरवाणा आहे. त्यांच्याकडून असा पोरकटपणा कायम केला

**राज्यात महायुतीचे सरकार आहे पारनेर तालुका हा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा बाल किल्ला असून विद्यमान आमदार काशिनाथ दाते सर हे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे आमदार असून राज्य सरकारकडून बस स्थानक इमारतीसाठी निधी उपलब्ध करून काम वेगाने हाती घेण्यात आले आहे. या इमारतीचे श्रेय महायुती सरकारचे यांचे आहे . असे ठणकावून सांगत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे तालुका युवक अध्यक्ष भास्कर उचाळे पुढे म्हणाले की, महायुतीच्या सरकारचे श्रेय घेण्याचा जो केविलवाणा प्रयत्न सुरू केला आहे. त्यातून विरोधकांच्या प्रवृत्तीचे दर्शन होते असा जोरदार टोला त्यांनी लगावला.**

**पारनेर बस स्थानक इमारत कामास महायुतीच्या शासनाने निधी मंजूर केला असून पालकमंत्री राधाकृष्ण विखे, विद्यमान आमदार काशिनाथ दाते सर तसेच महायुतीच्या पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत या बस स्थानक इमारत कामाचा भूमिपूजन सोहळा लवकरच होणार असून विरोधकांच्या होणाऱ्या भूमिपूजनास सोहळ्यास महामंडळाचे अधिकारी उपस्थित राहिल्यास त्यांच्याविरुद्ध विधानसभेत हक्कभंगाचा प्रस्ताव सादर करून उद्याच्या काळामध्ये लोकप्रतिनिधीच्या रोशाला सामोरे जावे लागणार आहे असा इशारा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या महिला तालुकाध्यक्ष सुषमा रावडे यांनी दिला आहे.**

जातो गेल्या पाच वर्ष पासून मतदार संघातील जनता हे पाहत आहे.

केंद्रातील व राज्यातील महायुतीचे मंत्री आणि नेत्यांसोबत फोटो काढायचे स्वतःचे कौतुक करून घ्यायचे आणि मी कसा पाठपुरावा केला हे सोशल मीडियातून दाखवायची पद्धत पारनेर - नगर मतदारसंघातील जनतेच्या आता लक्षात आले आहे , असा हल्लाबोल राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष विक्रमसिंह कळमकर यांनी केला आहे.

## थोडक्यात

### चंद्रकला दासरी यांच्या “थांब थांब कासारा” गीताला रसिकांची पसंती



**पुणे (आरंभ पर्व) : प्रसिध्द गायिका चंद्रकला दासरी या गेल्या चार दशकांपासून गायनाच्या माध्यमातून संपूर्ण महाराष्ट्राला आपल्या गोड आवाजातून रसिकांना मंत्रमुग्ध करत आहेत. त्यांनी गायलेल्या “थांब थांब कासारा” या आगरी – कोळी गीताची सध्या सोशल मिडीयावर प्रचंड चर्चा आहे. दासरी यांनी “थांब थांब कासारा... माझ्या बाया का रुसल्यान रं..” हे गीत तीन दशकापूर्वी गायिले होते. टिप्स कंपनीने बनवले हे गीत पुन्हा नव्याने संगीतकार अनील वैती यांनी बनवले आहे. हे गीत रसिकांना भावू लागले आहे. सदरील गीत ट्रेन्डींगमध्ये आले असून ह्या गीताच्या लाखो रील्स बनल्या असून ते मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहेत. त्या म्हणाल्या की माझे वडील भजनसम्राट वासुदेव सुतार यांच्याकडून मी गायकी शिकले. लहानपनापासूनच मी वडिलांसोबत भजनांच्या कार्यक्रमांना जात होते. त्यांच्याकडूनच मला गायनाचे बाळकडू मिळाले. वडिलांच्या काळात माझी गायनाची कला बहरली आणि माझे पती सुप्रसिद्ध संगीतकार आणि गायक बजरंग बादशाहा यांच्या काळात ती गायनाची कला फुलू लागली. उत्तरा केळकर, वैशाली सामंत, सुलोचना चव्हाण, श्रीकांत नारायण अशा दिग्गज पार्श्वगायकांसोबत मी पार्श्वगायन केले आहे. आगरी – कोळ्यांची लता मंगेशकर असे लोक मला बोलतात. त्याच समाधान आहे. कारण गानकोकिळा लता मंगेशकर माझ्या आदर्श आहेत.**

### "गौरीशंकर'मधून उलगडणार प्रतिशोधाची अनोखी कथा




**पुणे (आरंभ पर्व) : आजवर चित्रपटांतून प्रतिशोधाच्या वेगवेगळ्या कथा मांडल्या गेल्या आहेत. आता 'गौरीशंकर' या आगामी चित्रपटातून प्रतिशोधाची नवी कथा उलगडणार आहेत. नव्या दमाचे कलाकार असलेला "गौरीशंकर" हा चित्रपट २८ फेब्रुवरीला प्रेक्षकांच्या भेटीला येणार असून नुकतेच या चित्रपटाचे मोशन पोस्टर सोशल मीडियावर प्रदर्शित करण्यात आले आहे. मुव्ही रूट प्रस्तुत आणि ऑरेंज प्रोडक्शन निर्मिति संस्थेअंतर्गत 'गौरीशंकर' या चित्रपटाची निर्मिती करण्यात आली असून विशाल प्रदीप संपत हे या चित्रपटाचे निर्माते आहेत. हरेकृष्ण गौडा यांनी चित्रपटाचं दिग्दर्शन, रोशन खडगी यांनी छायाचित्रण केले आहे. संकेत कोळंबेकर यांनी लिहिलेल्या गीतांना अमित जवळकर यांनी संकलन, प्रशांत निशांत यांचे सुमधुर संगीत लाभले आहे. या चित्रपटात हरेकृष्ण गौडा, दक्षिणा राठोड, काव्या (कविता) सूर्यवंशी वसानी, राहुल जगताप या नवोदित कलाकारांच्या दमदार भूमिका आपल्याला पहायला मिळणार आहेत. 'गौरीशंकर' या चित्रपटातली कथा आहे गौरी आणि शंकर यांच्या प्रेमाची... दुर्दैवानं त्यांच्या प्रेमात एक संकट निर्माण होते. त्याच्यावर आलेल्या संकटाचा प्रतिशोध घेण्याचा प्रयत्न या आशयसूत्रावर 'गौरीशंकर' हा चित्रपट बेतला आहे. नव्या दमाचे कलाकार हे या चित्रपटाचं वैशिष्ट्य आहे. त्यामुळे एक थरारक, रोमांचक मनोरंजक कथानक मोठ्या पडद्यावर पाहण्यासाठी 'गौरीशंकर' प्रदर्शित होण्याची रसिकप्रेक्षकांना अजुन थोडी वाट पहावी लागणार आहे.**

## अतुलनीय लक्झरी : रोल्स-रॉयस घोस्ट सीरीज ॥ भारतात दाखल

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

रोल्स-रॉइस मोटर कार्सच्या इतिहासातील सर्वात लोकप्रिय नेमप्लेटची नवीनतम उत्क्रांती, घोस्ट सिरीज ॥, आता भारतात उपलब्ध आहे. एक शक्तिशाली, ड्रायव्हर-ओरिएंटेड आणि सुंदर सादरीकरण असलेल्या घोस्टच्या एकात्मिक आणि आत्मविश्वासू बाह्य स्वरूप हे सूक्ष्म उत्क्रांती असलेल्या बेस्पोक कमिशनसाठी एक शक्तिशाली टप्पा म्हणून कार्य करते. ग्राहकांच्या आवडी-निवडी वाढविण्यासाठी आता इंटीरियर फिनिश आणि घोस्टमध्ये कधीही उपलब्ध नसलेल्या वैशिष्ट्यांचा तसेच बेस्पोकला डिजिटल जगात प्रवेश देणाऱ्या प्रगत सॉफ्टवेअर तंत्रज्ञानाचा वापर करता येईल.

"आमचे ग्राहक घोस्टच्या हाताळणी क्षमता आणि बेस्पोकसाठीच्या त्याच्या क्षमतेचे खरोखर कौतुक करतात. घोस्ट सिरीज ॥ तिच्या तत्त्वांशी विश्वासू राहते, तरीही ती तिच्या अस्तित्वाच्या प्रत्येक पैलूला उन्नत करते. ही आतापर्यंतची सर्वात तांत्रिकदृष्ट्या प्रगत आणि ड्रायव्हर-केंद्रित V12 रोल्स-रॉइस आहे आणि तिचा आत्मविश्वासपूर्ण देखावा सर्जनशील धाडसी कमिशनसाठी एक शक्तिशाली टप्पा म्हणून काम करतो ज्यामुळे ती परिपूर्ण ड्रायव्हर-केंद्रित टूरिंग मशीन बनते. ब्रँडने भारतातील एक अत्यंत इच्छित लक्झरी ब्रँड म्हणून आपले स्थान पुन्हा एकदा सिद्ध केले आहे, २०२४ मध्ये बाजारपेठ जवळजवळ एक तृतीयांश वाढेल.

## सोनालिकाने सर्वाधिक एकत्रित विक्रीची केली नोंद

**पुणे (दै. आरंभ पर्व)**



भारताचा क्रमांक एकचा निर्यात ब्रँड सोनालिका ट्रॅक्टर्सने २०२५ हे नवीन वर्ष प्रेरणादायक घडामोडीने सुरू केले असून जानेवारीतील १०,३५० ट्रॅक्टरच्या आजवरच्या सर्वाधिक एकत्रित विक्रीची नोंद केली आहे. सोनालिकाच्या रोमहर्षक प्रवासातील या नव्या टप्प्यात शेतकऱ्यांच्या यशासाठी कृषी प्रयोगशीलता पुरविण्यावर जोरदार भर देण्यासह कंपनीची सातत्यपूर्ण वाढ आणि देशांतर्गत उद्योगापेक्षा वरचढ कामगिरीचा समावेश आहे. कंपनीने जानेवारी २०२४ मध्ये एकत्रित ९,७६९ ट्रॅक्टर विक्रीची नोंद केली होती.


भारताचे कृषी क्षेत्र शाश्वततेचे युग आणि सतत सुधारित होत असलेल्या कृषी पद्धतींमधून वाटचाल करत आहे. अर्थव्यवस्थेच्या वाढीचे इंधन म्हणून कृषी क्षेत्रावर केंद्र सरकारच्या अर्थसंकल्पात दिलेला भर पाहता ट्रॅक्टर उद्योगसुद्धा देशाच्या विकासाला चालना देणारी शक्ती म्हणून कायम राहील. प्रत्येक शेतकऱ्याला आपल्या शेतीचा अनुभव एका नव्या पातळीवर नेता यावी यासाठी त्यांना शक्तिशाली, कार्यक्षम आणि विश्वासार्ह कृषी यंत्रसामुग्री मिळेल, याची सुनिश्चिती करत असताना सोनालिका ट्रॅक्टर उद्योगात सातत्याने नवे मानदंड निर्माण करत आहे. सोनालिका हा १५० पेक्षा अधिक देशांमध्ये विश्वसनीय ब्रँड असून ग्राहकांच्या समाधानाची हमी देण्यासाठी कंपनी आपल्या कटिबद्धतेवर ठाम आहे. त्यातून पुढील अभूतपूर्व कामगिरीसाठी प्रेरणा मिळते. या अचंबित करणाऱ्या कामगिरीबद्दल इंटरनॅशनल ट्रॅक्टर्स लिमिटेडचे संयुक्त व्यवस्थापकीय संचालक श्री. रमण मित्तल म्हणाले, आम्ही नेहमीच आमच्या विश्वासावर आणि सर्वोत्तम उत्पादने व सेवा उपलब्ध करून देणे, आमच्या भागधारकांचे हित जपणे आणि कोणत्याही शॉर्टकटशिवाय नैतिकतेने व्यवसाय करणे या तीन मुख्य तत्वांवर अवलंबून राहिलो आहोत. त्यामुळे ट्रॅक्टर उद्योगात कामगिरीचे नवीन मानदंड स्थापित करण्यासाठी आमच्या मर्यादा ओलांडण्यासाठी आम्हाला नेहमीच प्रेरणा मिळाली आहे.

श्री. मित्तल पुढे म्हणाले की दक्षिण, पश्चिम आणि मध्य क्षेत्रांमध्ये पाण्याच्या साठ्यात लक्षणीय वाढ झाली असून ती गेल्या १० वर्षांच्या सरासरी एलपीएपेक्षा जास्त आहे. शिवाय, अनुकूल ला निना परिस्थितीमुळे रब्बी पीक क्षेत्र आणखी वाढण्याची अपेक्षा आहे. वर्ष २०२५ मध्ये आणखी मोठे टप्पे गाठण्याची आमची अपेक्षा असून कस्टमाईज्ड ट्रॅक्टर वितरित करण्यासाठी आणि प्रत्येक प्रदेशात शेतकऱ्यांच्या समृद्धीला चालना देण्यासाठी आम्ही वचनबद्ध आहोत.

## शालेय पोषण आहारातून अंडी बंद - डॉ. कल्याण गंगवाल

**पुणो (दै. आरंभ पर्व)**

शालेय पोषण आहारातून अंडी बंद करून महाराष्ट्र शासनाने एक महत्वाचे पाऊल उचललेले आहे. महाराष्ट्र शासनाने घेतलेला हा निर्णय शालेय विद्यार्थ्यांच्या आरोग्यासाठी उपयुक्त आहे. कारण अंड्यांवरती कोणतेही एक्सपायरी डेट नसते. त्यामुळे ती अंडी ताजी की शिळी हा मोठा प्रश्न होता. त्यामुळे पोषण आहारात विद्यार्थ्यांच्या शरीरासाठी घातक होती. असे मत शाकाहार चळवळीचे पुरस्कर्ते, सर्वजीव मंगल प्रतिष्ठानचे संस्थापक डॉ. कल्याण गंगवाल यांनी व्यक्त केले. गेल्या अनेक वर्षांपासून शाकाहारासाठी डॉ. कल्याण



गंगवाल लढा उभारला आहे. त्यांच्या या लढ्याला यश मिअल्लेनासून आता शालेय पोषण आहारातून अंडी कायमची बंद केली आहेत.

डॉ. गंगवाल म्हणाले, की शालेय विद्यार्थ्यांच्या आरोग्याला अंड्यांची बिलकुल गरज नाही. कारण की अंड्यामध्ये १३.५ टक्के प्रोटीन असते. तर गव्हामध्ये २० -२५ टक्के आणि सोयाबीन मध्ये ४० -४५ टक्के प्रोटीन असते. शालेय आहारात अंडी नसली तरी काही फरक पडत नाही. उलट अंड्यांमधली विषारी द्रव्य मुलांपर्यंत पोहोचणार नाहीत. प्रत्येक अंड्यामध्ये ३००-३५० मिली ग्रॅम कोलेस्ट्रॉल असते. जे हृदयाला उपायकारक आहे. कोंबड्यांला अनैसर्गिक आहार दिला जातो, त्यामुळे अंड्यात अनेक टॉक्सिन्स येतात. या पूर्वी अंड्यामध्ये डि. डी. टी (DDT) चे अंश सापडले होते.

ते पुढे म्हणाले की, कोंबड्यांना अँटिबियटिक्स, हॉर्मोन्स दिले जातात. त्याचे अंश अंड्यात येतात. अंड्यामध्ये साल्मोनेला - टायफॉईडचे जंतू अनेक वेळा आढळतात. अंडी तयार करण्यासाठी कोंबड्यांवर पोल्ट्रीफार्ममध्ये भयानक अत्याचार केले जातात. अंडे २४ तास उजेडात ठेवणे, डीबेकिंग ऑपरेशन ऑपरेशन (चोंच तोडणे) केले जाते, व कोंबडीला केवळ अंडी देणार मशिन म्हणून ट्रीटमेंट देणे, हे सर्वच क्रूर आणि अत्याचारी आहे .त्यामुळे गेल्या अनेक वर्षांपासून मी उभा केलेल्या प्राणी आणि पक्षी संरक्षणाच्या लढ्याला अखेर यश आले आहे. त्यामुळे महाराष्ट्र शासनाची विशेष आभार मानतो की हा त्यांनी घेतलेला निर्णय खूप योग्य आणि विद्यार्थ्यांच्या आरोग्यासाठी उपयुक्त आहे.




## पोलादपूर तालुका रहिवासी संघातर्फे भव्य सत्काराचे आयोजन

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुण्याच्या विविध भागात स्थायिक झालेल्या पोलादपूर तालुक्यातील मूळ रहिवासी एकत्र यावेत या उद्देशाने पोलादपूर तालुका रहिवासी संघातर्फे रविवार, ९ फेब्रुवारी रोजी सत्कार समारंभ, स्नेहसंमेलनचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमात पोलादपूर भूमिपुत्र प्रवीण दरेकर (आमदार- विधान परिषद, अध्यक्ष-मुंबई बँक) यांच्या हस्ते केंद्रीय नागरी विमान वाहतूक व सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, महाराष्ट्र राज्याचे कॅबिनेट मंत्री भरतशेठ गोगावले, माधुरीताई मिसाळ (राज्यमंत्री, महाराष्ट्र ) आणि संतोष मेढेकर (उद्योजक) यांचा नरवीर तानाजी मालुसरे आणि सिंहगड यांची प्रतिमा आणि शाल व श्रीफळ देऊन गौरविण्यात येणार आहे.

## एंजेल वनची नवीन कामगिरी : ३० दशलक्ष क्लायंट्‌सचा टप्पा ओलांडला

**मुंबई (दै. आरंभ पर्व)**

एंजल वन लिमिटेड या आघाडीच्या फिनटेक खेळाडूने 30 दशलक्ष ग्राहकांचा टप्पा ओलांडून एक महत्त्वाचा टप्पा गाठला आहे. जानेवारी 2025 मध्ये, कंपनीच्या ग्राहकांमध्ये वाढ होऊन ते 30.13 दशलक्ष एवढे झाले. गेल्या वर्षीच्या तुलनेत ही वाढ 47.5% एवढी आहे. त्याचे सरासरी क्लायंट फंडिंग बुक ₹41.99 अब्जांपर्यंत वाढले, तर युनिक म्युच्युअल फंड SIP मध्ये 57.7% ची वार्षिक वाढ नोंदवत ते 765.80 हजारापर्यंत वाढले. ऑप्शन प्रीमियमवर आधारित एकूण इक्विटी उलाढालीसाठी बाजारातील हिस्सा 19.7% पर्यंत वाढला आहे, जो वार्षिक विस्तार 192 bps असल्याचे सांगतो. ही अपवादात्मक वाढ एंजल वनचे उद्योगातील नेतृत्व मजबूत करते. अत्याधुनिक तंत्रज्ञान, ग्राहक-प्रथम दृष्टीकोन, वित्तीय सेवांमध्ये नावीन्य आणि ग्राहकांप्रती अतूट बांधिलकी याच्या आधारावरच ही वाढ शक्य झाली आहे.

प्रामुख्याने Gen Z आणि Millennials वर लक्ष केंद्रित करून Angel One सातत्याने डिजिटल जाणकार गुंतवणूकदारांच्या अपेक्षा जाणून घेत त्या पूर्ण करत आहे. त्याचे सुपर अ‍ॅप वैयक्तिकृत शिफारसी, प्रगत ट्रेडिंग टूल्स आणि रीअल-टाइम मार्केटमधील दृष्टिकोन देत, अखंड गुंतवणुकीचा अनुभव प्रदान करते. कंपनीने काही नावीन्यपूर्ण वैशिष्ट्ये देखील लॉन्च केली आहेत जसे की:

ऑनलाइन DIS (पेपरलेस स्टॉक ट्रान्सफर): सुरक्षित आणि त्रासमुक्त व्यवहाराची सोय करणे.

ट्रेलिंग स्टॉप लॉस : नफा लॉक करण्यासाठी स्टॉप-लॉस स्वयं-समायोजित करून जोखीम व्यवस्थापन वाढवते आणि मार्केटमधील चढउताराप्रमाणे तोटा मर्यादित करतो.

प्रगत तंत्रज्ञानासह अशा नवकल्पनांमुळेच टियर 2, टियर 3 आणि शहरांबाहेरील एंजेल वनच्या वाढीस चालना दिली आहे.

या महत्त्वपूर्ण टप्प्याबाबत भाष्य करताना, एंजल वन लिमिटेडचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक श्री. दिनेश ठक्कर म्हणाले, "30 दशलक्ष क्लायंटचा टप्पा पार करणे हा एक अविश्वसनीय टप्पा आहे, जो आमची नवकल्पना आणि ग्राहकांच्या विकसित गरजा पूर्ण करण्याची आमची वचनबद्धता दर्शवितो. मजबूत कर्मचारी आणि अधिकाऱ्यांसह, आम्ही ग्राहकांना उत्तम आणि अखंड अनुभव देण्यासाठी प्रगत समाधाने सतत एकत्र करतो. आमचे अत्याधुनिक तंत्रज्ञान आम्हाला वैयक्तिकृत आर्थिक प्रवास ऑफर करण्यास सक्षम करते, आम्हाला FinTech स्पेसमध्ये नेतृत्वाचे स्थान देते. आमच्या प्रवासाचा महत्त्वाचा भाग ठरल्याबद्दल आम्ही आमच्या सर्व भागीदारांचे आणि क्लायंटचे आभारी आहोत!.”

गुंतवणुकीचे लोकशाहीकरण आणि डिजिटल अनुभव वाढविण्याच्या समर्पणाला एंजेल वनचे हे यश अधोरेखित करते. मजबूत म्युच्युअल फंड SIP चा आधार घेत, ₹600 कोटींचे वैयक्तिक कर्ज डिसेंबर 24 पर्यंत वितरित केले गेले आणि विमा व्यवसायासाठी बीटा चाचणी सुरू आहे. एक-स्टॉप आर्थिक मंच म्हणून कंपनी आपली स्थिती मजबूत करत आहे. संपत्ती व्यवस्थापन आणि AMC व्यवसायाच्या पाठिंब्याने, नावीन्यपूर्ण, ग्राहकांचे समाधान आणि अत्याधुनिक तंत्रज्ञानासाठी एंजेल वन वचनबद्ध आहे, जे वित्तीय सेवांच्या भविष्याला आकार देते.

# “फॉरेस्ट ट्रेल्स" टाउनशिपमधील रहिवाशांची PMRDA आयुक्तांकडे तक्रार

### परांजपे स्कीम कन्स्ट्रक्शन लि.वर (PSCL) अनियमिततेचे गंभीर आरोप



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

खासगी टाउनशिप फॉरेस्ट ट्रेल्स येथील रहिवाशांनी परांजपे स्कीम कन्स्ट्रक्शन लि. (PSCL) विरोधात वाढत्या समस्या आणि टाउनशिप मधील अनियमिततेच्या विरोधात आवाज उठवला आहे. 6 जानेवारी 2025 रोजी रहिवाशांनी प्रभात रोडवरील PSCL च्या कार्यालयासमोर शांततापूर्ण निदर्शने केली होती. त्यानंतर, टाउनशिप मधील सुमारे 500 कुटुंबांनी पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (PMRDA) आयुक्तांकडे अधिकृत सुनावणी घेण्याची मागणी केली.

PMRDA आयुक्तांनी रहिवाशांच्या मागणीला मान्यता देत 21 जानेवारी 2025 रोजी आपल्या कार्यालयात सुनावणी घेतली. फॉरेस्ट ट्रेल्स येथील विविध सोसायट्यांचे प्रतिनिधी या सुनावणीत सहभागी झाले. रहिवासी श्री. उदय कुलकर्णी यांनी पॉवर पॉइंट सादरीकरणाद्वारे पुरावे सादर करत, प्रकल्प विकासकाने (PP) केलेल्या गंभीर अनियमितता आणि शासनाच्या अटींचे उल्लंघन याबाबत सविस्तर माहिती दिली.

सुनावणीच्या दरम्यान, श्री. कुलकर्णी यांनी सांगितले की, शासनाने PSCL ला टाउनशिप मंजुरी देताना काही अटी घातल्या होत्या, मात्र या अटींचे वारंवार उल्लंघन झाले आहे.

त्यांनी पुराव्यांसह हेही निदर्शनास आणले की, प्रकल्प विकासकाने शासनाकडे खोटे प्रतिज्ञापत्रे आणि खोटा अनुपालन अहवाल सादर करून मंजुरी घेतली आहे.

PMRDA ने टाउनशिपशी संबंधित अनियमिततेची सखोल चौकशी करण्याचा निर्णय घेतला असून, रहिवासी आता अधिकृत तपासणीची प्रतीक्षा करत आहेत.

रहिवाशांच्या मुख्य तक्रारी : वारंवार खंडित होणारा वीजपुरवठा . शासनाच्या नियमानुसार, प्रकल्प विकासकाने वीजपुरवठ्यासाठी MSEDCL ला जागा देऊन उपकेंद्र उभारणे गरजेचे होते. मात्र, 12 वर्षांनंतरही टाउनशिप मध्ये विजेचे उपकेंद्र नाही. परिणामी, संपूर्ण टाउनशिप गावाच्या ग्रिडवर अवलंबून आहे, आणि त्यामुळे वारंवार वीज खंडित होते.

अतिरिक्त दराने पाणीपुरवठा : टाउनशिप मंजुरीच्या अटींनुसार, वाजवी दरात पिण्याचे पाणी पुरवणे आवश्यक आहे. हा दर सुरूवातीला २०१२ साली १६₹/किलोलीटर इतका होता. २ वर्षानी तो ४८₹/ किलोलिटर केला गेला.आणि आता तो १००₹/कीलोलिटर इतका वाढवण्यात आला आहे. वाढीव दराने पाण्याचे पैसे भरले नाही तर पाणीपुरवठा बंद करण्याचाही इशारा रहीवाशांन देण्यात आला आहे.या संबंधित तक्रार रहिवाशांनी पोलीस स्टेशन ला नोंदविली आहे.

मूलभूत सुविधा नाहीत : नियमानुसार 38 एकर बाग, मैदाने आणि उद्याने असणे गरजेचे आहे, मात्र टाउनशिपमध्ये 3 एकापेक्षा ही कमी जागा या सुविधांसाठी वापरण्यात आली आहे.

२१०१२ सालापासून रुग्णालयासाठी राखीव ठेवलेल्या जागेवर विक्री कार्यालय उभे आहे. काही इमारतींमध्ये मलनिस्सारण संयंत्र (STP) नाही, त्यामुळे मैलाविहीन पाणी थेट टाक्यांमध्ये साठवले जात आहे.

टाउनशिप नियमांमध्ये प्रकल्प विकासकाने चुकीची व दिशा भूल करणारी माहिती दिल्यास टाउनशिप ची परवानगी रद्द करुन चालू काम थांबवण्याची अट प्रकल्प विकासकावर घातली आहे.